मुहम्मद (स.)
इस्लामचे पैगंबर

लेखक
प्रा. के. एस. रामाकृष्ण राव

भाषांतर
मुबारक हुसेन मनियार

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

प्रस्तावना

प्रसिध्द तत्त्ववेत्ते प्रा. के. एस. रामकृष्ण राव यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनाचा व त्यांच्या शिकवणींचा सखोल अभ्यास केला आहे. आपल्या सखोल अभ्यासाद्वारे आपले मत बुद्धिवादी लोकांसाठी मांडावयाचे ठरविले आणि त्यानुसार त्यांनी भारतात. 'मुहम्मद-दि प्रोफेट ऑफ इस्लाम' (मुहम्मद (स.) - इस्लामचे पैगंबर) या नावाने पुस्तिका प्रकाशित केली, सदर पुस्तिका अनेक वेळा भारतात आणि भारताबाहेर यापूर्वीसुध्दा प्रकाशित झाली आहे.

'इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट मुंबई' सगळ्यांच्या फायद्यासाठी याचे मराठी भाषांतर 'मुहम्मद (स.) इस्लामचे पैगंबर' या नावाने प्रकाशित करीत आहे. इस्लाम आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याविषयी आपल्या देशातील बांधवांत जे गैरसमज पसरविले जात आहेत, त्यांच्या निराकरणासाठी 'इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स' मराठी भाषेमध्ये अशी पुस्तके प्रकाशित करीत आहे. त्यामुळे इस्लामची खरी शिकवण लोकांसमोर प्रस्तुत होत आहे.

अल्लाहचे आभार मानतो की त्याने ही चांगली कामगिरी आमच्या नशिबी लिहिली. अल्लाहने या पुस्तिकेला लोकांना सद्बुध्दी देण्यासाठी मार्गदर्शिका बनवावे.

इंजि. तौफीक असलम खान

चेअरमन,

इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट

मुहम्मद (स.) यांचा जन्म अरबस्थानच्या वाळवंटात, मुस्लिम इतिहासकारांच्या कथनानुसार २० एप्रिल ५७१ मध्ये झाला. 'मुहम्मद' म्हणजे ज्यांची अतिशय स्तुती केली जाते. माझ्या मते ते अरब देशाच्या समस्त सत्पुरुषांमध्ये मोठे प्रज्ञाशील व सर्वाधिक कुशाग्र बुध्दी बाळगणारे पुरुष होते. त्यांच्या पूर्वीच काय पण त्यांच्या नंतरही या तांबड्या वाळूच्या दुर्गम वाळवंटात जन्मलेल्या समस्त कवी आणि राज्यकर्त्यांच्या तुलनेने त्यांचा प्रभाव कितीतरी पटीने अधिक व्यापक आहे.

जेव्हा पैगंबरांचे शुभागमन झाले तेव्हा अरबस्थान एक निर्जन वाळवंट मात्र होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रबळ आत्म्याने या निर्जन वाळवंटात एक नवीन विश्व निर्माण केले. एक नवजीवन, एक नवसंस्कृती आणि एक नवीन सभ्यता उदयास आणली. त्यांनी एका अशा नवीन राज्याची स्थापना केली, जे मोरोक्कोपासून इंडीजपर्यंत पसरले आणि ज्याने आशिया, आफ्रिका व यूरोप या तीन खंडांच्या वैचारिक जीवनावर आपला प्रभाव पाडला.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याविषयी जेव्हा मी लिहिण्याचा संकल्प केला, तेव्हा सुरुवातीला मला संकोच वाटला, कारण ही एका अशा धर्माबाबत लिहिण्याची बाब होती, ज्याचा मी अनुयायी नाही. ही एक नाजुक बाबही आहे कारण जगात वेगवेगळ्या धर्मांना मानणारे लोक आढळून येतात आणि एकाच धर्माचे अनुयायीदेखील परस्परविरुध्द विचारप्रणाली (Schools of Thoughts) व संप्रदायांमध्ये विभागलेले असतात.

वस्तुत: कधी कधी हा दावा केला जातो की, धर्म संपूर्णपणे एक व्यक्तिगत बाब आहे, परंतु या गोष्टीचा इन्कार केला जाऊ शकत नाही की, धर्मात संपूर्ण विश्वाला आपल्या वेढ्यात घेण्याची प्रवृत्ती आढळून येते. त्याचा संबंध दृश्य गोष्टींशी असो अथवा अदृश्य गोष्टींशी, तो कोणत्याही क्षणी आमच्या हृदयात आमच्या आत्म्यात किंबहुना आमच्या मन-मस्तिष्कात शिरकाव करतो. त्याचा संबंध त्याच्या प्रेरणेशी असो, अवप्रेरणेशी किंवा अप्रेरणेशी असो किंवा एखाद्या अशा भागाशी असो ज्याविषयी आम्ही कल्पना करू शकतो. ही समस्या अशा वेळेस अधिकच गंभीर आणि महत्त्वपूर्ण ठरते जेव्हा या गोष्टींचा पूर्ण विश्वासही असेल की, आमचा भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ सर्वच एका अतिशय कोमल, नाजुक, संवेदनशील, रेशमी धाग्याने गुंफिलेले आहेत. आम्ही जास्तच संवेदनशील झालो तर मात्र आमचे संतुलन केंद्र अतिशय तणावपूर्ण स्थितीत राहण्याची शक्यता निर्माण होते. या दृष्टिकोनातून पाहिल्यास इतरांच्या धर्माबाबत कमीतकमी बोलणे हेच श्रेयस्कर ठरते. आमच्या धर्मांना तर फारच खाजगी असले पाहिजे. त्याचे स्थान तर आमच्या अंत:करणात असले पाहिजे आणि या संदर्भात आमचे तोंड न उघडलेलेच बरे.

परंतु या समस्येचा एक दुसरा पैलूही आहे की, माणूस समाजात राहातो आणि आमचे जीवन इच्छा-अनिच्छेने कळतनकळत इतरांच्या जीवनाशी जुळलेले असते. आम्ही एकाच धरणीचे अन्न खातो, एकाच जलस्रोताचे पाणी पितो आणि एकाच वायुमंडलाच्या हवेत श्वास घेतो. अशा अवस्थेतही आम्ही आपल्या व्यक्तिगत विचारप्रणाली व धार्मिक आस्थांवर कायम असावे. आम्ही थोडेफार हेही जाणून घेतले पाहिजे की, आमचा शेजारी कशाप्रकारे विचार चिंतन करतो, त्याच्या कर्माचे मुख्य प्रेरक स्रोत कोणते आहेत? तर ही माहिती निदान आपल्या वातावरणाशी सुसंगती निर्माण करण्यास सहाय्यक ठरेल. ही अतिशय वाखाणण्याजोगी गोष्ट आहे की, माणसाने जगातल्या सर्वच धर्मांबाबत योग्य भावनेसह जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, एकमेकांविषयी माहिती आणि सामंजस्य व मिळून मिसळून वागण्याची भावना त्यामुळे वृद्धिगत होते. तसेच आम्ही अधिक चांगल्या प्रकारे आपल्या जवळच्या किंवा दूरच्या शेजाऱ्याची कदर जाणतो.

वस्तुत: आमचे विचार एवढे विस्कळीत नाहीत, जसे ते बाह्यत: दिसून येतात. खरे पाहता, ते काही केंद्रांभोवती एकत्रित होऊन स्फटिकासारखे रूप धारण करतात. त्यांना जगातल्या महान धर्म व चेतनाशील आस्थांच्या स्वरूपात पाहतात. ते पृथ्वीवर लक्षावधी जीवनांचे मार्गदर्शन करतात आणि त्यांना प्रेरितही करतात. यास्तव, जर आम्ही या विश्वाचे आदर्श नागरिक होण्याची इच्छा बाळगतो, तर ही आमची जबाबदारी आहे की आम्ही त्या महान धर्म व त्या तत्त्वज्ञानीय सिध्दांतांना जाणून घेण्याचा यथाशक्ती, प्रयत्न करावा, ज्यांचे मानवजातीवर शासन राहिले आहे.

या प्रारंभिक निवेदनानंतरही धर्माचे क्षेत्र असे आहे की, जिथे नेहमी बुद्धी व संवेदना यांच्यात संघर्ष दिसून येतो. इथे पाय घसरण्याची एवढी शक्यता असते की माणसाला त्या वादात अल्पज्ञ लोकांचाही विचार करावा लागतो. जे अशा ठिकाणीही शिरकाव करतात, जिथे प्रवेश करताना फरिश्तेही भयकंपित होतात. या अनुरोधाने ही अगदी बिकट समस्या आहे. माझ्या लेखाचा विषय एका धर्माच्या सिध्दान्ताशी संबंधित आहे. तो धर्म ऐतिहासिक आहे आणि त्याच्या पैगंबराचे व्यक्तिमत्त्वदेखील ऐतिहासिक आहे. येथपावेतो की सर विल्यम म्यूरसारखा इस्लामविरोधी टीकाकारही कुरआनविषयी लिहितो, ‘‘कदाचित जगात (कुरआनशिवाय) एखादा अन्य ग्रंथ असा नाही, जो बारा शतकांपावेतो आपल्या विशुध्द पाठासह अशाप्रकारे सुरक्षित असेल.’’ मी या वक्तव्यात आणखी एवढे वाढवू शकतो की, पैगंबर मुहम्मद (स.) देखील एक अशा प्रकारचे एकमेव ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व आहे, ज्यांच्या जीवनाच्या प्रत्येक प्रसंगास अगदी सावधानतापूर्वक विशुध्द स्वरूपात सूक्ष्मातिसूक्ष्म विवरणासह भावी काळातल्या

वंशाकरिता सुरक्षित केले गेले आहे. त्यांचे जीवन आणि त्यांचे कार्य रहस्याच्या पडद्याआड लपलेले नाही. त्यांच्यासंबंधी यथायोग्य माहिती प्राप्त करण्याकरिता एखाद्याला आकाश-पाताळ एक करण्याची व भटकण्याची गरज नाही. सत्यरूपी मौक्तिक प्राप्त करण्यासाठी प्रचंड ढिगाऱ्यातून भूसा उडवून काही दाणे प्राप्त करण्यासारख्या कठीण परिश्रमाचीही गरज नाही.

माझे काम अधिक सोपे झाले आहे की, आता तो काळ वेगाने जात आहे जेव्हा काही राजनैतिक व काही टीकाकार इस्लामचे चुकीचे व अतिशय भ्रामक चित्रण करीत असत. प्रा. बीवान 'कॅम्ब्रिज मेडिवल हिस्ट्री' (Cambridge Madieval History) या पुस्तकात लिहितात, 'इस्लाम आणि पैगंबर मुहम्मद (स.) विषयी १९ व्या शतकाच्या उदयापासून पूर्व यूरोपात जी पुस्तके प्रकाशित झाली, त्यांची पात्रता केवळ वाङ्मयीन कुतूहलापुरती राहिली आहे.'

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्र लिहिण्याची समस्या माझ्याकरिता फारच सोपी झाली आहे. कारण आता आम्ही या प्रकारच्या भ्रामक ऐतिहासिक तथ्यांचा आश्रय घेण्यासाठी अगतिक नाहीत. आता इस्लामच्या संदर्भात भ्रामक निरुपणांना स्पष्ट करण्यात आमचा वेळ वाया जात नाही.

उदाहरणार्थ, इस्लामी सिध्दान्त आणि तलवारीची गोष्ट एखाद्या विशिष्ट क्षेत्रात प्रभावी शैलीत ऐकू येत नाही. इस्लामचा हा सिध्दान्त की, धर्मसंदर्भात कसलीही बळजबरी नाही, आज सर्वांना चांगल्या प्रकारे कळला आहे. जगप्रसिध्द इतिहासकार गिबनने म्हटले आहे, 'मुस्लिमांशी ही चुकीची व घातक धारणा जोडली गेली आहे की, त्यांनी प्रत्येक धर्माचा तलवारीच्या बळावर नि:पात करावा.' हा इतिहासकार असेही म्हणतो की, या अज्ञानपूर्वक आरोपाचे कुरआनद्वारेही पूर्णत: खंडन होते आणि मुस्लिम नेत्यांचा इतिहास तसेच ख्रिश्चनांच्या पूजापाठाबद्दल त्यांच्यातर्फे कायदेशीर व सार्वजनिक उदारतेचे जे दर्शन घडले त्याद्वारेही हा आरोप मिथ्या व तथ्यशून्य ठरतो.

एका कबिल्याच्या (टोळीच्या) अतिथीचा उंट दुसऱ्या कबिल्याच्या कुरणात नजरचुकीने जातो. या किरकोळ घटनेवरून उत्तेजित होऊन जे अरब लोक ४० वर्षे एवढ्या भयंकरपणे लढत राहातात. दोन्ही बाजूंकडील सुमारे ७० हजार माणसे ठार होतात आणि दोन्ही कबिल्यांचा नायनाट होण्याची भीती उत्पन्न होते. अशा शीघ्रकोपी आणि भांडखोर जनसमूहास इस्लामच्या पैगंबरांनी आत्मसंयम आणि शिस्त या गोष्टींची अशी शिकवण दिली, असे प्रशिक्षण दिले की ते युध्दभूमीतही नमाज अदा करीत असत.

विरोधकांशी समझोता व मिलाप करण्याकरिता त्यांनी वारंवार प्रयत्न केले. जेव्हा सर्वच प्रयत्न फोल ठरले व स्थिती अशी उद्भवली की, त्यांना केवळ स्वसंरक्षणार्थ रणांगणात यावे लागले, तेव्हा त्यांनी रणनीतीस अगदी वेगळे रूप दिले. त्यांच्या आयुष्यात जेवढ्या लढाया झाल्या, येथपावेतो की संपूर्ण अरब देश त्यांच्या अधिकारक्षेत्राखाली आला, त्या सर्व लढायांमध्ये कामी येणाऱ्या मानवी प्राणांची संख्या काही शंभराहून अधिक नाही.

पैगंबरांनी अत्याचारी अरबांना सर्वशक्तिशाली अल्लाहची उपासना म्हणजेच नमाज अथवा प्रार्थनेची शिकवण दिली. एकट्याने नव्हे तर सामूहिक रूपाने अदा करण्याची, येथपावेतो की युध्दाचे धूळलोट उठले असतानाही नमाजची निर्धारित वेळ आल्यावर आणि ही दिवसातून पाच वेळा येते. सामूहिक नमाज (जमातीसह नमाज) चा त्याग करणे तर दूरची गोष्ट तिला स्थगितही केले जाऊ शकत नाही. एक समूह आपल्या अल्लाहपुढे नतमस्तक होण्यात तर दुसरा, शत्रूपक्षाशी मुकाबला करण्यात व्यस्त राहात असे. जेव्हा पहिला समूह नमाज अदा करून मोकळा होत असे तेव्हा तो दुसऱ्या समूहाची जागा घेत असे आणि दुसरा समूह नमाज अदा करीत असे.

अत्याचारकाळात मानवतेचा विस्तार युध्दभूमीपर्यंत केला गेला. तंबीपूर्ण आदेश दिले गेले की, ना मृत सैनिकाच्या प्रेतांचे अवयव तोडले जावेत आणि ना कोणाला धोका दिला जावा, वा विश्वासघात केला जावा आणि ना अपहार केला जावा. स्त्रिया, मुले किंवा वृध्दांना ठार केले जाऊ नये आणि ना खजूर व इतर फळ देणाऱ्या वृक्षांना कापले किंवा जाळले जावे. वैराग्य पत्करलेल्या संतांना व त्या लोकांना त्रास दिला जाऊ नये जे उपासनेत मग्न आहेत. आपल्या रक्तपिपासू वैऱ्याशी स्वत: पैगंबरांची वागणूक त्यांच्या अनुयायींकरिता एक चांगला आदर्श आहे. मक्केवर आपल्या विजयाप्रसंगी ते आपल्या अधिकारशक्तीच्या सर्वोच्च स्थानी होते. हे तेच शहर, ज्याने त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना छळले, यातना दिल्या, ज्याने त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना देशाबाहेर घालविले आणि ज्याने त्यांना मोठ्या वाईट रीतीने छळले व बहिष्कृत केले. वास्तविक त्यांनी दोनशे मैलांहून अधिक अंतरावर आश्रय घेतला होता. तेच नगर आज त्यांच्या पायाशी पडले होते. युध्द नियमानुसार, त्यांच्याशी व त्यांच्या सहकाऱ्यांशी जो क्रूरतापूर्ण व्यवहार केला गेला त्याचा सूड घेण्याचा त्यांना पूर्ण हक्क प्राप्त होता. परंतु त्यांनी या शहरवासीयांशी कसे वर्तन केले? पैगंबर मुहम्मद (स.) यांचे हृदय प्रेम व करुणेने उचंबळून आले. त्यांनी घोषणा केली, "आज तुमच्यावर कोणताही आरोप नाही आणि तुम्ही सर्व स्वतंत्र आहात."

स्वरक्षणार्थ युध्दाची अनुमती देण्याच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी एक हेही होते

की, मानवतेला एकतासूत्रात गुंफिले जावे. जेव्हा हे उद्दिष्ट पूर्ण झाले, तेव्हा त्या निकृष्टतम वैऱ्यांनाही माफ केले गेले, ज्यांनी त्यांचे प्रिय काका माननीय हमजा (रजि.) यांना ठार करून त्यांच्या प्रेताची अवहेलना केली व पोट फाडून काळीज बाहेर काढून दातांनी चावून टाकले.

विश्वबंधुत्वाचा नियम आणि मानव समानतेचा सिध्दान्त, ज्याची घोषणा त्यांनी केली, तो त्या महान योगदानाची ओळख करून देणारा आहे, जो पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मानवतेच्या सामाजिक उत्थानाकरिता दिला आहे. तसे पाहिले तर सर्वच मोठ्या धर्मांनी एकाच सिध्दान्ताचा प्रचार केला आहे. परंतु इस्लामच्या पैगंबरांनी अर्थात पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सिध्दान्तांना व्यावहारिक स्वरूपात सादर केले. या योगदानाची किंमत कदाचित त्याक्षणी पूर्णत: मान्य केली जाऊ शकेल, जेव्हा आंतरराष्ट्रीय चेतना जागृत होईल. सांप्रदायिक पक्षपात आणि पूर्वग्रह पूर्णपणे लयाला जातील आणि मानवबंधुत्वाची एक दृढ धारणा वास्तविकपणे समोर येईल.

इस्लामच्या विश्वबंधुत्व या पैलूवर आपले विचार मांडताना सरोजिनी नायडू म्हणतात, ''हा पहिला धर्म होता ज्याने लोकतंत्राची शिकवण दिली आणि त्याला एक व्यावहारिक रूप दिले. उदाहरणार्थ, जेव्हा मिनाऱ्यावरून अजान दिली जाते आणि उपासना करणारे मस्जिदींमध्ये एकत्र होतात. तेव्हा इस्लामचे लोकतंत्र दिवसातून पाच वेळा साकार होते. जेव्हा राजा आणि रंक खांद्याला खांदा लावून उभे राहातात आणि पुकारतात, ''अल्लाहु अकबर' अर्थात अल्लाहच श्रेष्ठ आहे.'' भारताची महान कवयित्री सरोजिनी नायडू आपले विचार मांडताना पुढे म्हणते, ''इस्लामच्या या अविभाज्य एकतेस पाहून मी फार प्रभावित झाले. ती लोकांना सहजगत्या एकमेकांचा बंधू बनवते. जेव्हा तुम्ही एका इजिप्शियनशी, एका अल्जेरियनशी, एका भारतीयाशी आणि एका तुर्कीशी लंडनमध्ये भेट घेता, तेव्हा तुम्हाला हे जाणवेल की त्यांच्या नजरेत या गोष्टीचे काहीच महत्त्व नाही की एकाचा संबंध इजिप्तशी आहे आणि एकाचा भारताशी वगैरे.''

महात्मा गांधी आपल्या अद्‌भूत शैलीत म्हणतात, ''असे म्हटले जाते की, यूरोपवासी, दक्षिण आफ्रिकेत इस्लाम धर्माच्या प्रसारामुळे भयभीत आहेत. त्या इस्लामपासून ज्याने स्पेनला सभ्य बनविले, त्या इस्लामपासून ज्याने मोरोक्कोपर्यंत ज्ञानाचा प्रकाश पोहचविला आणि संपूर्ण विश्वाला बंधुभावाचे बायबल शिकविले. दक्षिण आफ्रिकेतील यूरोपियन इस्लामच्या विस्तारामुळे केवळ एवढ्यासाठी भयभीत आहेत की त्याच्या अनुयायींनी गौरवर्णीयांशी समानतेची मागणी करू नये? असे असेल तर त्यांचे भयभीत होणे योग्यच आहे. बंधुभाव पाप आहे, कृष्णवर्णीयांची गौरवर्णीयांशी समानता होण्याची त्यांना भीती वाटते. तर मग (इस्लामच्या प्रसाराने) त्यांच्या भयभीत

होण्याचे कारणही लक्षात येऊ शकते.''

प्रत्येक वर्षी हजयात्रेप्रसंगी वंश, वर्ण, जाती, पंथादि भेदभावांपासून मुक्त इस्लामच्या चमत्कारपूर्ण आंतरराष्ट्रीय भव्य मेळाव्यास संपूर्ण जग पाहते. केवळ यूरोपवासीच नव्हे तर आफ्रिकी, इराणी, भारतीय, चिनी वगैरे सर्वच मक्का येथे एका विशाल परिवाराचे सदस्य या स्वरूपात एकत्र होतात. सर्वांचा पोषाख सारखाच असतो. सर्वजण न शिवलेल्या दोन पांढऱ्या चादरींमध्ये असतात. एक कमरेला बांधलेली तर दुसरी खांद्यावर टाकलेली. सर्वांचे डोके उघडे असते. कसल्याही दिखावा किंवा बनावटपणाचे प्रदर्शन नसते. लोकांच्या मुखातून हेच शब्द निघतात,

''मी हजर आहे. हे अल्लाह! मी तुझ्या आज्ञेचे पालन करण्यासाठी हजर आहे. तू एकमेव आहेस आणि कोणीही तुझा सहभागी नाही.''

अशाप्रकारे असे काहीही शिल्लक राहात नाही की ज्यामुळे एखाद्यास मोठा म्हटले जावे आणि दुसऱ्यास लहान. प्रत्येक हाजी इस्लामच्या आंतरराष्ट्रीय महत्तेचा प्रभाव घेऊन स्वगृही परततो.

प्रा. हर्गरोन्ज (Hurgronje) यांच्या शब्दांत, इस्लामच्या पैगंबरांद्वारे प्रस्थापित राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय एकता आणि विश्वबंधुत्वाच्या नियमांना अशा सार्वभौमिक आधारांवर स्थापन केले आहे, जे इतर राष्ट्रांना मार्गदर्शन करीत राहातील. प्रा. हर्गरोन्ज पुढे लिहितात, वस्तुस्थिती ही की, राष्ट्रसंघाच्या धारणेस वास्तविक रूप देण्याकरिता इस्लामची ही कामगिरी आहे. जगातले कोणतेही राष्ट्र याचे उदाहरण सादर करू शकत नाही.

इस्लामच्या पैगंबरांनी लोकशाही शासनप्रणालीस त्याच्या सर्वोत्कृष्ट स्वरूपात स्थापन केले. खलीफा उमर (रजि.) आणि खलीफा अली (रजि.) (पैगंबरांचे जावई), खलीफा मन्सूर अब्बास (रह.) (खलीफा मामून (रह.) यांचे पुत्र) आणि इतर अनेक खलीफा आणि मुस्लिम शासकांना एका सामान्य व्यक्तीप्रमाणे इस्लामी न्यायालयात न्यायाधीशांसमोर हजर व्हावे लागले. आम्ही सर्व हे जाणतो की, काळ्या निग्रो लोकांशी आजदेखील 'सभ्य' श्वेतवर्णीय कसा व्यवहार करतात? मग आपण आजपासून चौदाशे वर्षांपूर्वी पैगंबरांच्या काळात काळे निग्रो माननीय बिलाल (रजि.) यांच्याविषयी कल्पना करा. इस्लामच्या सुरूवातीच्या काळात नमाजकरिता अजान देण्याच्या सेवेस अतिशय आदरणीय व मोठ्या मानाचे पद समजले जात असे. हा आदर या गुलाम निग्रोला प्रदान केला गेला होता. मक्केवर विजय प्राप्त केल्यानंतर त्यांना आदेश दिला गेला की, नमाजकरिता अजान द्या. हा काळ्या रंगाचा व जाड ओठांचा निग्रो

गुलाम इस्लामी विश्वाच्या सर्वाधिक पवित्र आणि ऐतिहासिक वास्तु अर्थात काबागृहाच्या छतावर अजान देण्याकरिता चढला. त्या वेळी काही अहंकार बाळगणारे अरब ओरडले, "अरेरे! वाईट होवो त्याचे, तो काळा हब्शी गुलाम अजान देण्याकरिता पवित्र काबागृहाच्या छतावर चढला आहे."

कदाचित हाच तो वंशासंबंधीचा गर्व आणि पूर्वग्रह होता, ज्याच्या उत्तरादाखल पैगंबरांनी एक प्रवचन दिले. वास्तविक या दोन्ही गोष्टी मुळासकट नाहीशा करणे त्यांच्या उद्दिष्टांपैकी होते. आपल्या प्रवचनात त्यांनी समजावून सांगितले, सर्व प्रशंसा आणि कृतज्ञता अल्लाहकरिता आहे. त्याने आम्हाला अज्ञानकाळाचा अभिमान व अन्य वाईट गोष्टींपासून मुक्ती दिली. लोकांनो, लक्षात ठेवा की, संपूर्ण मानवजात दोन वर्गांत विभागली गेली आहे. धर्मनिष्ठ आणि अल्लाहचे भय बाळगणारे लोक जे अल्लाहच्या नजरेत प्रतिष्ठित आहेत, दुसरे मर्यादेचे उल्लंघन करणारे, अत्याचारी अपराधी व कठोरहृदयी लोक जे अल्लाहच्या नजरेत पतित व तिरस्कृत आहेत. अन्यथा सर्व मानव आदमची संतती आहे आणि अल्लाहने आदमला मातीपासून निर्माण केले. याचीच पुष्टि पवित्र कुरआनात पुढील शब्दांत केली गेली आहे,

"लोकांनो, आम्ही तुम्हाला एका पुरुष आणि एका स्त्रीपासून निर्माण केले आणि मग तुमची राष्ट्रे आणि वंश बनविले जेणेकरुन तुम्ही एकमेकांना ओळखावे. वास्तविकत: अल्लाहजवळ तुमच्यापैकी सर्वात जास्त प्रतिष्ठित तो आहे जो तुमच्यापैकी सर्वात जास्त ईशपरायण आहे. निश्चितच अल्लाह सर्वकाही जाणणारा आणि खबर राखणारा आहे." *(दिव्य कुरआन, ४९:१३)*

अशा रीतीने पैगंबर मुहम्मद (स.) जनमानसात विलक्षण परिवर्तन करण्यात सफल झाले. सर्वाधिक पवित्र आणि प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या वंशाच्या अरबांनीही या निग्रो गुलामासमोर आपल्या मुलीशी विवाह करण्याचा प्रस्ताव मांडला. इस्लामचे दुसरे खलीफा आणि मुस्लिमांचे अमीर (अध्यक्ष) इतिहासात फारुके आजम (महान फारूक) या नावाने प्रसिध्द आहेत. या निग्रोला पाहाताच ते त्वरीत उभे राहात आणि या शब्दांत त्यांचे स्वागत करीत, "आमचे मोठे, आमचे सरदार येत आहेत." भूतलावर तत्कालीन सर्वाधिक स्वाभिमानी जनसमूह, अरब जनसमूह, त्यांच्यात कुरआन आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांनी केवढे महान परिवर्तन केले. याच कारणास्तव जर्मनीच्या एका फार मोठ्या कवीने गोयटेने पवित्र कुरआनविषयी आपले उद्‌गार प्रकट करताना घोषणा केली आहे की, "हा ग्रंथ प्रत्येक युगात लोकांवर आपला अत्याधिक प्रभाव पाडत राहील." याच कारणास्तव जॉर्ज बर्नार्ड शॉ यांचेही म्हणणे आहे, "जर पुढील शंभर वर्षांत इंग्लंडच नव्हे तर संपूर्ण यूरोपवर एखाद्या धर्माच्या शासन करण्याची शक्यता आहे

तर तो आहे इस्लाम.''

इस्लामची ही लोकतंत्रीय प्रवृत्ती आहे जिने स्त्रीला पुरुषाच्या दास्यत्वातून मुक्ती दिली. सर चार्ल्स इ. ए. हेमिल्टनने म्हटले आहे, ''इस्लामची शिकवण ही आहे की मनुष्य आपल्या स्वभावाच्या दृष्टीने निरपराध आहे. तो असे शिकवतो की, स्त्री आणि पुरुष दोन्ही एकाच तत्त्वापासून निर्माण झाले. दोघांमध्ये एकच आत्मा आहे आणि दोघांमध्ये याची समानरीत्या क्षमता आढळून येते की, ते मानसिक, आध्यात्मिक आणि नैतिकदृष्ट्या उन्नती करू शकतील.''

अरब लोकांमध्ये ही परंपरा होती की, वारसाधिकारी एकटा तोच होऊ शकत असे जो बरची-तलवार चालविण्यात सिध्दहस्त असे. परंतु इस्लाम स्त्रीउध्दारक या रूपाने आला आणि त्याने स्त्रीला पैतृक वारसात हिस्सेदार बनविले. त्याने स्त्रियांना शेकडो वर्षांपूर्वीच संपत्तीत मिळकतीचा अधिकार दिला. त्याच्या बारा शतकांनंतर इ. स. १८८१ मध्ये त्या इंग्लंड देशात जो लोकतंत्र प्रणालीचा प्रणेता समजला जातो, त्याने इस्लामचा हा सिध्दान्त अंगीकारला आणि त्याकरिता "The Married Women's Act" (विवाहित स्त्रियांचा विधिनियम) या नावाचा कायदा पास झाला. परंतु या घटनेच्या १२०० वर्षांपूर्वीच पैगंबरांनी ही घोषणा केलेली होती की, स्त्री-पुरुष जोडीत स्त्रिया, पुरुषांच्या अर्धांगिणी होत. 'स्त्रियांच्या अधिकाराचा आदर केला गेला पाहिजे.' या गोष्टीचे भान राहावे की स्त्रिया आपले निश्चित अधिकार प्राप्त करीत आहेत (किंवा नाहीत?)

इस्लामचा राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेशी थेट संबंध नाही, किंबहुना हा संबंध अप्रत्यक्षरीत्या आहे आणि जेथपावेतो राजकीय व आर्थिक गोष्टी माणसाच्या आचरणास प्रभावित करतात, त्या सीमेवर दोन्ही क्षेत्रांत त्याने नि:संशय अतिमहत्त्वपूर्ण आर्थिक जीवनाचे सिध्दान्त मांडले आहेत. प्रा. मेसिंगनन यांच्या कथनानुसार, इस्लाम दोन प्रतिकूल टोकांच्या दरम्यान संतुलन कायम करतो आणि सभ्यता व संस्कृतीचा पाया असलेल्या चरित्रनिर्मितीची सदैव काळजी घेतो. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व समाजविरोधी तत्त्वांवर नियंत्रण मिळविण्यासाठी इस्लाम आपल्या वारसाहक्काचा कायदा आणि संघटित व अनिवार्य जकातच्या व्यवस्थेद्वारे काम घेतो आणि एकाधिकार, व्याज खाणे, प्राप्त न झालेल्या उत्पन्न व लाभांना आधीच निश्चित करून घेणे, बाजारपेठेवर कब्जा करणे, साठेबाजी, बाजारातील सर्व सामुग्री खरेदी करून किमती वाढविण्याच्या हेतूने कृत्रिम टंचाई निर्माण करणे इत्यादी सर्व कामांना अवैध घोषित करतो. इस्लाम धर्मात जुगारदेखील अवैध आहे. याउलट शिक्षणसंस्था, उपासनास्थळे आणि रुग्णालयांना सहाय्य करण्यास व विहिरी खोदणे, अनाथालये स्थापन करण्यास मोठ्या पुण्याईचे कार्य सांगितले आहे. असे म्हटले जाते की,

अनाथालयांचा आरंभ पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीनेच झाला. आजचे विश्व आपल्या अनाथालयांची स्थापना करण्यासाठी त्याच पैगंबर मुहम्मद (स.) यांचे कृतज्ञशील आहे जे स्वत: अनाथ होते. सुप्रसिध्द आंग्ल लेखक थॉमस कार्लाईल, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याविषयी आपले मनोगत प्रकट करताना म्हणतो, "या सर्व चांगल्या गोष्टी हे दर्शवितात की, निसर्गाच्या सान्निध्यात वाढलेल्या या वाळवंटी पुत्राच्या हृदयात मानवता, दया आणि समताभाव निसर्गत: होता."

एका इतिहासकाराचे कथन आहे की, एखाद्या महान व्यक्तीची पारख तीन गोष्टींवरून केली जाऊ शकते,

(१) तो त्याच्या समकालीन लोकांना धैर्यशील, तेजस्वी आणि खरे आचरण बाळगणारा आढळून आला काय?

(२) त्याने आपल्या युगाच्या पातळीहून उंच होण्यात उल्लेखनीय महानतेचा परिचय दिला काय?

(३) त्याने सर्वसाधारणपणे समस्त विश्वाकरिता आपल्यामागे एखादा कायमस्वरूपी वारसा सोडला काय?

ही यादी आणखी लांब केली जाऊ शकते. परंतु जेथपावेतो पैगंबर मुहम्मद (स.) यांचा संबंध आहे ते या तिन्ही कसोटींवर पूर्णत: खरे ठरतात. शेवटच्या दोन गोष्टींविषयीच्या काही प्रमाणांचा सुरूवातीलाच उल्लेख केला गेला आहे.

या तीन कसोट्यांमध्ये पहिली कसोटी, पैगंबर त्यांच्या समकालीन लोकांना तेजस्वी, धैर्यशाली आणि खऱ्या आचरणाचे आढळून आले काय?

या संदर्भात ऐतिहासिक पुरावे साक्ष देतात की, मित्र काय आणि वैरी काय, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या समकालीन सर्वच लोकांनी जीवनाच्या सर्व व्यवहारांत व सर्व क्षेत्रांत पैगंबरांचे उत्कृष्ट गुण, त्यांची दुर्दम्य निश्चलता आणि संशयविरहित विश्वासार्हता मान्य केली आहे. येथपावेतो की, यहुदी आणि ते लोक ज्यांना त्यांच्या संदेशावर विश्वास नव्हता, तेदेखील पैगंबरांना आपल्या भांडणतंट्यात पंच किंवा मध्यस्थ बनवीत. कारण त्यांना त्यांच्या नि:पक्षपाती वर्तनावर पुरेपूर विश्वास होता. त्यांच्या संदेशावर श्रद्धा न राखणारे लोकदेखील हे म्हणण्यास प्रवृत्त होत, "हे मुहम्मद (स.) आम्ही तुम्हाला खोटारडा म्हणत नाही, तर त्याचा इन्कार करतो ज्याने तुम्हाला ग्रंथ प्रदान केला, ज्याने तुम्हाला रसूल (पैगंबर) बनविले." ते असे समजत की, पैगंबरांवर एखाद्या जिन्न वगैरेचा प्रभाव आहे. त्यापासून मुक्ती देण्याकरिता ते पैगंबरांविरुध्द हिंसा पातळीवर पोहचले.

त्यांच्यात जे उत्तम लोक होते, त्यांनी हे पाहिले की, पैगंबरांवर एक दिव्य तेज अवतरले आहे. तेव्हा पैगंबरांकडे ज्ञानप्राप्तीकरिता त्यांनी धाव घेतली. पैगंबरांच्या जीवनइतिहासाचे हे वैशिष्ट्य उल्लेखनीय आहे की, त्यांचे अगदी जवळचे नातेवाईक, त्यांचे प्रिय चुलत भाऊ, त्यांच्या अगदी जवळचे एकनिष्ठ मित्र ज्यांचा त्यांच्याशी जवळचा परिचय होता, या सर्वांनी त्यांच्या संदेशाच्या सत्यतेस मन:पूर्वक मानले आणि याचप्रकारे त्यांच्या पैगंबरत्वविषयक सत्यतेसही मानले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर श्रद्धा बाळगणारे उच्चकुलीन, सुशिक्षित व बुध्दिमान स्त्रिया व पुरुष त्यांच्या व्यक्तिगत जीवनाशी चांगल्या प्रकारे परिचित होते. त्या सर्वांना पैगंबरांच्या व्यक्तिमत्त्वात जर विश्वासघात व अपहाराचे किंचितमात्र लक्षण आढळले असते किंवा त्यांच्या अंगी संपत्तीचा लोभ किंवा आत्मविश्वासाची कमतरता आढळली असती, तर त्यांचे चारित्र्यउभारणी, आत्मिक जागृती व समाजोद्धाराच्या सर्व आशा-आकांक्षावर आभाळ कोसळले असते. एका नव्या वास्तुच्या निर्मितीकरिता त्यांनी उभारलेला संपूर्ण सांगाडा क्षणार्धात खाली कोसळला असता. याउलट आम्ही असे पाहातो की, त्यांच्या अनुयायींची निष्ठा व पैगंबराविषयी त्यांच्या समर्थनाची दशा अशी होती की, त्यांनी स्वेच्छेने आपले जीवन पैगंबरांना अर्पण करून त्यांचे नेतृत्व स्वीकारले. त्यांनी पैगंबरांसाठी कष्ट यातनांना व धोक्यांना शूरपणाने झेलून घेतले. पैगंबरांवर श्रद्धा बाळगली, त्यांच्यावर अटळ विश्वास राखला, त्यांचे आज्ञापालन केले आणि त्यांचा अगदी अंत:करणपूर्वक सन्मान केला. हे सर्वकाही त्यांनी जीवघेण्या यातना सहन करून केले. तसेच सामाजिक बहिष्काराने उद्भवलेल्या घोर मानसिक यातनेस शांततेने सहन केले. येथपावेतो की यासाठी त्यांनी जिवाचीही पर्वा केली नाही. हे शक्य होते काय, जर त्यांना आपल्या नेत्यात किंचितही भ्रष्टता किंवा अनैतिकता आढळली असती?

सुरूवातीच्या काळात, इस्लाम धर्माचा स्वीकार करणाऱ्यांचे ऐतिहासिक किस्से वाचा. या निरपराध पुरुष व स्त्रियांवर केल्या गेलेल्या अमानवी अत्याचारांना पाहून कोणाचे डोळे आसवांनी भरणार नाहीत? एक निरागस स्त्री सुमैया (रजि.) यांना क्रूरतापूर्वक बरची मारून ठार केले गेले. एक उदाहरण यासिरचेही आहे, ज्यांच्या पायांना दोन उंटाशी बांधले गेले आणि नंतर त्या उंटाना परस्पर विरुध्द दिशेने हाकले गेले. खब्बाब बिन अरत (रजि.) यांना धगधगत्या निखाऱ्यांवर झोपवून निर्दयी अत्याचारी त्यांच्या छातीवर उभा राहिला, जेणेकरून त्यांनी हालचाल करू नये. येथपावेतो की त्यांची त्वचा जाळली गेली आणि चरबी विरघळून बाहेर आली. खब्बाब बिन अदींच्या मांसाचे निर्दयपणे लचके तोडून व त्यांच्या अंगप्रत्यंगांना कापून त्यांची हत्या केली गेली. या जीवघेण्या यातना देत असताना त्यांना विचारले गेले, तुझ्या जागी

पैगंबर मुहम्मद (स.) असते तर? (जे त्या वेळी आपल्या कुटुंबियांसमवेत घरात होते) तेव्हा यातनाग्रस्त खब्बाबने उंच स्वरात म्हटले की, पैगंबर मुहम्मद (स.) यांना एक काटा टोचण्याच्या किरकोळ त्रासापासून वाचविण्याकरिताही ते आपला प्राण, आपली मुलेबाळे, आपला परिवार किंबहुना आपले सर्वस्व अर्पण करण्यास तयार आहेत. अशा प्रकारचे हृदयाला पीळ पाडणारे अनेक प्रसंग सादर केले जाऊ शकतात, परंतु या सर्व घटना शेवटी काय सिध्द करतात? हे कसे होऊ शकते की, इस्लामच्या पुत्र व कन्यांनी केवळ निष्ठाच दाखविली नाही, तर त्यांनी आपले शरीर, मन आणि आत्मा भेट म्हणून त्यांना सादर केले? पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याविषयी त्यांच्या सहवासातील अनुयायींची काय ही दृढ आस्था आणि विश्वास! पैगंबरांना सोपविले गेलेले कार्याबद्दल त्यांच्या प्रामाणिकता, निष्कपटता व तन्मयतेचा हा अतिशय उत्तम पुरावा नव्हे काय?

या ठिकाणी ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, हे लोक ना खालच्या दर्जाचे होते आणि ना अज्ञानी. पैगंबरांच्या मिशनच्या सुरूवातीच्या काळात जे लोक त्यांच्या चहूबाजूस जमले, ते मक्केचे श्रेष्ठतम लोक होते. ते प्रतिष्ठित उच्च दर्जाचे, धनवान आणि सभ्य होते. यात पैगंबरांच्या वंश-परिवारातील निकटचे लोकही होते, ज्यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अंतर्बाह्य जीवनाची चांगली ओळख होती. सुरूवातीचे चारही खलीफा जे पुढे महान व्यक्तिमत्त्वाचे स्वामी झाले, इस्लामच्या आरंभकाळातच इस्लाममध्ये दाखल झाले.

'इन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'मध्ये असा उल्लेख आहे की, ''समस्त पैगंबर आणि धार्मिक क्षेत्रातील महान व्यक्तींमध्ये मुहम्मद (स.) सर्वाधिक सफल झाले आहेत.'' परंतु हे यश काही आकस्मित बाब नव्हती किंवा आकाशातून अकस्मात अवतरलेली नव्हती. किंबहुना हे त्या वास्तवतेचे फळ होते की, त्यांच्या काळातील लोकांना त्यांचे व्यक्तिमत्त्व धैर्यशील आणि निष्कपट आढळून आले. अर्थात हे फळ त्यांच्या प्रशंसनीय आणि अतिशय प्रभावशाली व्यक्तिमत्त्वाचाच परिणाम आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्व यथार्थतेला जाणून घेणे मोठे कठीण काम आहे. मी तर केवळ एखादी झलाक पाहू शकतो. पैगंबरांच्या व्यक्तिमत्त्वाचे कसकसे मनोहर दृश्य सतत नाटकीय प्रभावासह दृगोच्चर होतात. पैगंबर मुहम्मद (स.) अनेक रूपाने आमच्यासमोर येतात. मुहम्मद पैगंबर, मुहम्मद सेनाधिपती, मुहम्मद शासक, मुहम्मद योध्दे, मुहम्मद व्यापारी, मुहम्मद उपदेशक, मुहम्मद तत्त्वज्ञानी, मुहम्मद राजनीतिज्ञ, मुहम्मद वक्ते, मुहम्मद समाजसुधारक, मुहम्मद अनाथांचे पोषणकर्ते, मुहम्मद गुलामांचे रक्षक, मुहम्मद स्त्रीजातीचे उध्दारक, मुहम्मद न्यायनिष्ठ, मुहम्मद संत. या सर्व महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये व मानवतेच्या सेवा कार्यक्षेत्रात त्यांची योग्यता

समानरीतीने महानतम विश्वनायकाची आहे.

अनाथावस्था अतिशय लाचार व असहाय स्थितीचे दुसरे नाव आहे. या जगात पैगंबरांच्या जीवनाचा आरंभ याच स्थितीत झाला. राज्यसत्ता या जगातील भौतिक सामर्थ्याची पराकाष्ठा असते. पैगंबरांनी सामर्थ्याचे सर्वोच्च स्थान प्राप्त करून जगाचा निरोप घेतला. त्यांच्या जीवनाची सुरुवात एका अनाथ बालकाच्या रूपाने होते, नंतर आम्ही त्यांना एका यातनाग्रस्त देशत्याग केलेल्या स्वरूपात पाहातो आणि शेवटी आम्ही हे पाहातो की, ते एका संपूर्ण जनसमूहाचे ऐहिक व आध्यात्मिक नेता व त्यांचे भाग्यविधाते बनले. त्यांना या मार्गात ज्या कसोट्या, प्रलोभने, अडचणी व बदल, अंधकार व उजेड, भय व प्रतिष्ठा, परिस्थितीचा चढ-उतार इत्यादींतून जावे लागले, त्या सर्वांत ते सफल राहिले. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी एका आदर्श पुरुषाची भूमिका पार पाडली. त्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाशी लढा दिला व पूर्णतः विजयी झाले. त्यांच्या कर्तृत्वाचा संबंध जीवनाच्या एखाद्या विशिष्ट क्षेत्राशीच नाही, तर ते जीवनाच्या सर्वच क्षेत्रात व्यापलेले आहे.

उदाहरणार्थ; मोठेपण यावर अवलंबून आहे की, एखाद्याने अशा जनसमूहाची सुधारणा करावी जो सर्वप्रकारे क्रूरता, अत्याचार व असभ्यतेत आकंठ बुडालेला आहे. आणि नैतिकदृष्ट्या घोर अंधकाराच्या खोल गर्तेत पडला आहे. जगातील ती एकमेव सामर्थ्यवान व्यक्ती म्हणजे पैगंबर होत, ज्यांनी अरबांसारख्या अतिशय मागासलेल्या जनसमूहास उन्नत केले. त्याला सभ्यतेचा साज चढवून जणू शून्यातून एक मोठे विश्व निर्माण केले. अडाणी आणि रानटी वृत्तीच्या जनसमूहास जगात ज्ञान व सभ्यतेचा उजेड पसरविणारा बनविले. अशाप्रकारे त्यांची महानता पूर्णपणे सिध्द होते. मोठेपण या गोष्टीत असेल की एखाद्या समाजाच्या परस्पर भिन्न व इतस्ततः विखुरलेल्या तत्त्वांना बंधुत्व व स्नेहभावाच्या सूत्रांनी बांधले जावे तर वाळवंटात जन्मलेले पैगंबर निःसंशय या वैशिष्ट्यास व प्रतिष्ठेस पात्र आहेत. मोठेपण यात की, त्या लोकांची सुधारणा करण्यात आली, जे अंधविश्वास आणि अशा प्रकारच्या घातक रीतिरिवाज व सवयींनी जखडलेले आहेत. तर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी लक्षावधी लोकांना अंधविश्वास व निराधार भीतीपासून मुक्त केले. मोठेपण उच्च आचरणावर आधारित आहे, तर शत्रू-मित्र दोघांनी मुहम्मद (स.) यांना 'अल-अमीन' आणि 'अस-सादिक' अर्थात विश्वसनीय व सत्यवचनी या स्वरूपात स्वीकारले आहे. एक विजेता मोठेपणास योग्य आहे तर पैगंबर एक अशी व्यक्ती होय, जी अनाथ व असहाय आणि साधारण व्यक्तीच्या अवस्थेतून उठून आणि खुसरो व कैसरप्रमाणे अरब देशाचे स्वतंत्र शासक बनले. त्यांनी एक असे साम्राज्य स्थापित केले जे चौदाशे वर्षांचा दीर्घकाळ लोटल्यानंतरही

आजदेखील अस्तित्वात आहे. मोठेपणाचे लक्षण ते समर्पण होय, जे एखाद्या प्रमुखास त्याच्या अनुयायींकडून लाभते, तर आजदेखील समस्त विश्वात पसरलेले कोट्यवधी आत्म्यांना मुहम्मद (स.) हे शुभनाम जादूप्रमाणे सम्मोहित करते.

पैगंबरांनी अॅथेन्स, रोम, इराण, भारत किंवा चीनच्या ज्ञानकेंद्रांपासून तत्त्वज्ञानाचा धडा घेतला नव्हता. परंतु त्यांनी मानवतेस चिरस्थायी महत्ता बाळगणाऱ्या उच्च सत्यांशी ओळख करून दिली. ते स्वतः निरक्षर होते, परंतु त्यांना असे भावपूर्ण, आवेशपूर्ण प्रवचन करण्याची योग्यता प्राप्त होती की लोक भावविश्वात स्वत:ला हरवून बसत आणि त्यांच्या डोळ्यांतून आसवांची धार लागे. पैगंबर अनाथ होते, निष्कांचनही. परंतु जनमानसात त्यांच्याविषयी अथांग प्रेम होते. त्यांनी एखाद्या सैनिक अॅकॅडमीद्वारे शिक्षण घेतले नव्हते, तरीदेखील अडचणीत व प्रतिकूल स्थितीचे डोंगर पार करून त्यांनी सैन्यशक्ती जमवली आणि आपल्या आत्मबलाच्या जोरावर ज्यात ते अग्रेसर होते, कित्येक विजय प्राप्त केले. कौशल्यपूर्ण धर्मप्रचार करणारे, ईश्वराची देणगी लाभलेल्या योग्यतेचे लोक फार विरळेच. डेकार्डच्या कथनानुसार, 'आदर्श उपदेशक विश्वाच्या अतिदुर्लभ प्राण्यांपैकी आहे.' हिटलरनेही आपल्या "Mein Kamp" (माझी जीवनगाथा) या पुस्तकात असाच विचार व्यक्त केला आहे. तो लिहितो, 'महान सिध्दान्तवादी क्वचित प्रसंगीच महान नेता होतो, याउलट एका क्रांतिकारक व्यक्तीत नेतृत्वाची योग्यता जास्त असते. तो एक उत्तम नेता तर अवश्य असेल, कारण नेतृत्वाचा अर्थ आहे जनतेला प्रभावित आणि संचलित करण्याची क्षमता. नेतृत्वाच्या क्षमतेचा नवे विचार देण्याच्या योग्यतेशी काहीही संबंध नाही.'

पुढे तो म्हणतो, या भूतलावर एक मनुष्य सिध्दान्तवादीही असावा, संयोजकही असावा आणि नेताही असावा, हे अशक्यप्राय आहे. परंतु मोठेपण याच गोष्टीत सामावलेले आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या व्यक्तिमत्त्वात जगाने या अतिदुर्लभ गोष्टींना मूर्त स्वरूपात पाहिले आहे.

याहून अधिक आश्चर्यकारक टीप बास्बर्थ स्मिथने दिली आहे, ''पैगंबर जसे भौतिक राज्यसत्तेचे प्रमुख होते, तद्वतच ते धर्मप्रमुखही होते. जणू पोप व सीझर दोघांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या एकट्यात सामावले होते. ते सीझर (शासक) ही होते व पोप (धर्मगुरू) देखील होते. पण पोपच्या अवडंबरापासून मुक्त आणि ते असे सीझर होते ज्यांच्याजवळ शाही थाटमाट, मागेपुढे अंगरक्षक आणि भव्य राजमहाल नव्हते. महसूलप्राप्ती ठराविक नव्हती. एखादा मनुष्य असा दावा करतो की, त्याने दैवी अधिकाराने राज्य केले तर ते मुहम्मद (स.) हेच असू शकतात. कारण त्यांना बाह्य साधने व सहाय्यक गोष्टींविनाच राज्य करण्याचे सामर्थ्य लाभले होते. त्यांना याची पर्वा नव्हती की जे सामर्थ्य लाभले होते,

त्याच्या प्रदर्शनासाठी एखादे आयोजन करावे. त्यांच्या व्यक्तिगत जीवनात जो साधेपणा होता, तोच साधेपणा त्यांच्या सार्वजनिक जीवनातही होता.

मक्केवर विजय प्राप्त केल्यानंतर दहा लक्ष चौरस मैलाहून अधिक भूभाग त्यांच्या पायाखाली होता. संपूर्ण अरब भूमीचे ते स्वामी होते. तरीही ते जाडेभरडे लोकरी वस्त्रांची आणि जोड्यांची दुरुस्ती स्वत: करीत. बकरींचे दूध काढीत, घरातला केर काढीत, चूल पेटवत आणि परिवाराचे लहानसहान कामही स्वत: करीत. त्यांच्या जीवनाच्या शेवटच्या काळात संपूर्ण मदीना धनसंपन्न झाले होते. प्रत्येक ठिकाणी सोन्या-चांदीची विपुलता होती. असे असतानाही अरब देशाच्या या सम्राटाच्या घरात कित्येक दिवस चूल पेटत नसे. खजूर व पाणी एवढ्यावरच निर्वाह होत असे. त्यांच्या कुटुंबीयांना कित्येक रात्री उपाशीपोटी राहावे लागले. कारण संध्याकाळच्या जेवणासाठी काहीच राहात नसे. संपूर्ण दिवस कार्यमग्न राहिल्यानंतरही रात्री पैगंबर मऊ बिछान्यावर नव्हे, तर खजुरीच्या चटईवर झोपत. अधिकांश असे होई की, त्यांच्या नेत्रातून अश्रूधारा वाहू लागत आणि ते आपल्या पालनकर्त्याजवळ अशी प्रार्थना करीत की, त्याने कर्तव्यपूर्तिकरिता सामर्थ्य प्रदान करावे. कथनांद्वारे कळून येते की, रडतरडत त्यांचा गळा दाटून येई, आवाज निघेनासा होऊन असा भास होई की एखादे भांडे चुलीवर ठेवलेले असावे, त्यातले पाणी उकळत असावे. त्यांच्या निधनानंतर त्यांची एकूण धनसंपदा काही अल्पशी नाणी होती, ज्यातला एक भाग कर्ज अदा करण्यास कामी आला आणि बाकी गरजवंतांना दिला गेला, जे त्यांच्या घरी दान मागण्यासाठी गेले होते. ज्या कपड्यात त्यांनी शेवटचा श्वास घेतला त्यात अनेक ठिगळे लावलेली होती. ते घर ज्यापासून संपूर्ण जगात प्रकाश पसरला, ते बाह्यत: अंधकारात बुडाले होते, कारण दिवा लावण्याकरिता तेलसुध्दा नव्हते.

परिस्थितीत परिवर्तन झाले, पण अल्लाहचे पैगंबर बदलले नाहीत. विजयप्राप्ती असो किंवा पराजय, सत्ताप्राप्ती असो किंवा याउलटची स्थिती असो, सुस्थिती असो किंवा गरिबी, प्रत्येक अवस्थेत ते सारखेच राहिले. त्यांच्या उच्चतम चारित्र्यात कधीही फरक पडला नाही. अल्लहचा मार्ग आणि त्याच्या नियमांप्रमाणे पैगंबरांमध्येही कधीच परिवर्तन घडून येत नाही.

एक म्हण आहे, 'ईमानदार माणूस अल्लाहची उत्तम कृती आहे.' मुहम्मद (स.) तर ईमानदाराहून अधिक श्रेष्ठ होते. त्यांच्या अंगी मानवतापूर्ण भिनलेली होती. मनुष्याविषयी सहानुभूती व प्रेम त्यांच्या आत्म्याचे संगीत होते. मानवसेवा, त्याची उन्नती, त्याचा उत्कर्ष, त्याच्या आत्म्यास विकसित करणे, त्याला शिक्षित करणे, सारांश; मानवाला मानव बनविणे त्यांचे मिशन होते, एकमेव ध्येय होते. त्यांचे जगणे, मरणे सर्वकाही याच ध्येयाकरिता समर्पित होते. त्यांचे आचारविचार, कथन आणि

कर्माचा एकमात्र मार्गदर्शक सिध्दान्त व प्रेरणा स्रोत मानवजातीचे कल्याण हेच होते.

पैगंबर अतिशय नम्र, प्रत्येक अवडंबरापासून मुक्त व आदर्श आणि नि:स्वार्थ पुरुष होते. त्यांनी स्वत:ला कोणत्या पदव्या लावून घेतल्या? फक्त दोनच अल्लाहचा बंदा (दास) आणि त्याचा पैगंबर मुहम्मद (स.) देखील त्याच प्रकारचे पैगंबर व संदेशवाहक होते जसे विश्वाच्या प्रत्येक भागात इतर अनेक पैगंबर होऊन गेले. ज्यांच्यापैकी काहींना आम्ही जाणतो व अनेकांना नाही. या सत्य गोष्टींपैकी एखाद्यावरूनही श्रद्धा ढळली तर मनुष्य मुस्लिम म्हणून राहात नाही. ही समस्त मुस्लिमांची मूलभूत श्रध्दा आहे. एका यूरोपियन विचारवंताचे कथन आहे, तत्कालीन परिस्थितीत आणि त्यांच्या अनुयायींची त्यांच्याविषयी अगाध श्रध्दा लक्षात घेता पैगंबरांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य असे की, त्यांनी कधीही 'चमत्कार दाखवू शकेन' असा दावा केला नाही, त्यांच्याद्वारे अनेक चमत्कार दिसून आले, परंतु त्या चमत्कारांचे प्रयोजन धर्मप्रचाराचे नव्हते. त्या चमत्कारांचे श्रेय त्यांनी स्वत: न घेता पूर्णत: अल्लाहला व त्याच्या त्या अलौकिक पध्दतींना दिले, ज्या मानवजातीकरिता, रहस्यमय आहेत. पैगंबर स्पष्ट शब्दात सांगत की, तेदेखील अन्य मानवांसारखेच एक मानव आहेत. ते जमीन व आकाशांच्या खजिन्याचे मालक नाहीत आणि त्यांनी हा दावा कधीही केला नाही की, भविष्याच्या गर्भात कोणते रहस्यभेद लपलेले आहेत. हे सर्व अशा काळात घडले, जेव्हा आश्चर्यकारक चमत्कार दाखविणे साधुसंताकरिता मामुली गोष्ट समजली जात होती. जेव्हा अरबस्थान असो किंवा अन्य एखादा देश, संपूर्ण वातावरण अदृश्य आणि अलौकिक सिध्दीच्या जाळ्यात अडकले होते.

त्यांनी आपल्या अनुयायींचे लक्ष निसर्ग आणि त्याच्या नियमांच्या अध्ययनाकडे वळवले जेणेकरून त्यांनी ते जाणावे व अल्लाहच्या महानतेचे गुणगान करावे. कुरआन सांगतो.

"हे आकाश व पृथ्वी आणि त्यांच्या दरम्यानातील वस्तू आम्ही काही खेळ म्हणून बनविल्या नाहीत. त्यांना आम्ही सत्यधिष्ठित निर्माण केले आहे परंतु यांच्यापैकी बहुतेकजण जाणत नाहीत." *(दिव्य कुरआन, ४४:३८-३९)*

हे विश्व न एखादे भ्रम आहे आणि न उद्देशविरहित, किंबहुना यास सत्य आणि उद्देशासह निर्माण केले गेले आहे. कुरआनच्या त्या आयतींची संख्या ज्यांच्यात निसर्गाच्या सूक्ष्म निरीक्षणाचे आवाहन केले गेले आहे, त्या सर्व आयतींहून अधिक आहे, ज्या नमाज, रोजा, हज इत्यादी आदेशांशी संबंधित आहेत. या आयतींनी प्रभावित होऊन मुस्लिमांनी निसर्गाचे अगदी जवळून निरीक्षण करण्यास आरंभ केला.

त्यामुळे निरीक्षण व परीक्षण आणि प्रयोगाकरिता आवश्यक अशा वैज्ञानिक मनोवृत्तीस जन्म दिला, ज्याविषयी ग्रीकसुध्दा अनभिज्ञ होते. मुस्लिम वनस्पतीशास्त्रज्ञ इब्ने बतुता यांनी जगातील सर्व भूभागांच्या वनस्पती एकत्र करून वनस्पतीशास्त्रावर जो ग्रंथ लिहिला, त्याला 'मेयर' (Mayer) ने आपले पुस्तक "Geshder Botanica" मध्ये 'कठोर परीक्षणाचा पुरातन ठेवा' असे नाव दिले आहे. अलबैरूनी यांनी चाळीस वर्षे प्रवास करून खनिज पदार्थाचे नमुने एकत्र केले. तसेच मुस्लिम खगोलशास्त्रज्ञांनी १२ वर्षांहून अधिक काळ निरीक्षण आणि परीक्षणात घालवले; तेव्हा ॲरिस्टॉटलने एकही वैज्ञानिक परीक्षण केल्याखेरीज भौतिकशास्त्रावर लेखणी उचलली. भौतिकशास्त्राचा इतिहास लिहिताना त्याच्या निष्कळाजीपणाची दशा अशी आहे की त्याने बेधडक लिहिले की, 'माणसाचे दात जनावरापेक्षा अधिक असतात', परंतु हे सिध्द करण्याचे कोणतेही कष्ट घेतले नाहीत. वस्तुत: हे काही कठीण काम नव्हते.

शरीररचनाशास्त्राचा महान ज्ञाता शेलनने सांगितले आहे की, माणसाच्या खालच्या जबड्यात दोन हाडे असतात. या कथनास शेकडो वर्षे आव्हानाविना असंदिग्ध स्वरूपात मान्य केले जात राहिले. येथपावेतो की एक मुस्लिम विद्वान अब्दुल लतीफ यांनी एका नरकंकालाचे स्वत: निरीक्षण करून खरे काय ते जगाला सांगितले. या प्रकारच्या अनेक घटनांचा उल्लेख करताना रॉबर्ट ब्रीफ्फालट आपल्या प्रसिध्द पुस्तक "The Making of Humanity" (मानवतेचे सृजन) मध्ये आपले उद्‌गार पुढील शब्दांत व्यक्त करतात -

आमच्या विज्ञानावर अरबांचे उपकार केवळ त्यांच्या आश्चर्यजनक शोध किंवा क्रांतीकारी सिध्दांत आणि परिकल्पनांपुरते मर्यादित नाहीत, तर विज्ञानावर अरब सभ्यतेचे याहून फार जास्त उपकार आहेत आणि ते असे की स्वत: विज्ञानाचे अस्तित्व. हा लेखक पुढे लिहितो, 'यूनानी (ग्रीक) लोकांनी वैज्ञानिक कल्पनांना व्यवस्थित रूप दिले. त्यांना सामान्य नियमाचे रूप दिले आणि त्यांना सिध्दान्तबध्द केले. परंतु जेथपावेतो संशोधन करण्याच्या धैर्यपूर्ण पध्दतीचा शोध घेण्याचा, निश्चित निश्चयात्मक व स्वीकारात्मक तथ्यांना एकत्र करण्याचा, वैज्ञानिक अध्ययनाच्या सूक्ष्म पद्धती निर्धारित करण्याचा, व्यापक आणि दीर्घकालीन अवलोकन व निरीक्षण करण्याचा आणि परीक्षणात्मक विश्लेषण करण्याचा प्रश्न उद्भवतो, ही समस्त वैशिष्ट्ये ग्रीक स्वभावाकरिता अगदी अनोळखी होती, ज्याला आज सायन्स (विज्ञान) म्हणतात. त्या संशोधनाच्या नवीन पद्धती, परीक्षणाच्या पद्धती, अवलोकन व निरीक्षणाच्या पद्धती, परिमाणाच्या पद्धती आणि गणिताच्या विकासाच्या परिणामस्वरूप यूरोपमध्ये उन्नत झाल्या. त्यांच्या या स्वरूपाशी ग्रीक अगदीच अनभिज्ञ

होते. यूरोपीय जगतास या पद्धती व वैज्ञानिकी प्रवृत्तीची अरबांनीच ओळख करून दिली.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणींचाच हा व्यावहारिक गुण आहे ज्याने वैज्ञानिक दृष्टिकोनास जन्म दिला. याच शिकवणींनी दैनंदिन कामकाज व ज्यांना प्रापंचिक काम म्हटले जाते, त्या कामांनाही आदर आणि पावित्र्य प्रदान केले. कुरआन फर्मावितो,

''माणसाला अल्लाहच्या उपासनेकरिता निर्माण केले गेले आहे.''

परंतु उपासनेची आपली एक वेगळी परिभाषा आहे. ईश्वरोपासना केवळ पूजापाठ करण्यापूरती मर्यादित नाही. किंबहुना ते प्रत्येक कार्य जे अल्लाहच्या आदेशानुसार त्याची प्रसन्नता प्राप्त करण्याकरिता व मानवजातीच्या भलाईकरिता केले जाते, ते सर्व उपासनेच्या व्याख्येत मोडते. इस्लामने संपूर्ण जीवन आणि त्याच्याशी सलग्न असलेल्या समस्त व्यवहारांना पवित्र ठरविले, मात्र या अटीवर की प्रत्येक व्यवहार ईमानदारीपूर्वक, न्याय आणि सद्भावनापूर्वक केला जावा. पवित्र आणि अपवित्र यातला चालत आलेला अनुचित भेद समाप्त केला. कुरआन म्हणतो की,

''जर तुम्ही पवित्र आणि स्वच्छ भोजन घेऊन अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त केली, तर हीसुध्दा उपासनाच आहे.''

पैगंबरांनी म्हटले आहे की, ''जर कोणी आपल्या पत्नीस एक घास जेऊ घातले, तर हेदेखील पुण्याईचे व भलाईचे काम आहे आणि अल्लाहजवळ तो याचा चांगला मोबदला प्राप्त करील.'' पैगंबरांचे आणखी एक शुभवचन आहे की, ''जर कोणी आपली कामना व इच्छा पूर्ण करतो तर त्याचाही मोबदला त्याला लाभेल, मात्र या अटीवर की त्याने यासाठी तोच मार्ग अंगीकारावा जो वैध आणि योग्य आहे.'' ऐकणाऱ्यांपैकी एकजण आश्चर्याने म्हणाला, 'हे अल्लाहचे पैगंबर! तो तर केवळ आपल्या इच्छा व मनोकामनेस पूर्ण करतो.' यावर पैगंबर म्हणाले, ''जर त्याने आपल्या इच्छापूर्तिकरिता अवैध मार्गाचा व साधनांचा वापर केला असेल, तर त्याला त्याची शिक्षा मिळेल, तेव्हा उचित मार्ग अंगीकारण्याबद्दल त्याला इनाम का मिळू नये?''

धर्म पूर्णपणे अलौकिक विश्वाच्या मामल्यापुरता मर्यादित राहायला नको, तर त्याने ऐहिक जीवनाच्या उत्कर्षावरही लक्ष दिले पाहिजे. धर्माच्या या नव्या विचारप्रणालीने नीतिशास्त्र व आचारशास्त्राच्या नवीन मूल्यांना व सिध्दान्तांना नवे वळण लावले. त्याने दैनंदिन जीवनात लोकांच्या सामान्य परस्परसंबंधावर स्थायी प्रभाव पाडला. त्याने लोकांकरिता गहन सामर्थ्याचे काम केले. याखेरीज लोकांच्या हक्क व

कर्तव्यांच्या धारणांना व्यवस्थाबद्ध करणे आणि त्याचे निरक्षर लोकांसाठी व बुद्धिमान तत्त्ववेत्त्यांसाठी समानरीत्या आकलन व व्यवहारात आणण्याजोगे होणे पैगंबरांच्या शिकवणींची प्रमुख वैशिष्ट्ये होत. या ठिकाणी हे सावधानतापूर्वक लक्षात ठेवले पाहिजे की, सत्कर्मावर जोर देण्याचा हा अर्थ नव्हे की त्याकरिता धार्मिक आस्थांचे पावित्र्य आणि शुचिर्भूततेचा बळी दिला जावा. अशा कित्येक विचारप्रणाली आहेत ज्यात एक तर व्यावहारिक महत्त्वास मूठमाती देऊन श्रध्दातत्त्वांनाच सर्वकाही मानले गेले आहे किंवा धर्माची विशुद्ध भावना व आस्थांची तमा न बाळगून केवळ कर्मालाच महत्त्व दिले गेले आहे. याउलट इस्लाम सत्य आस्था आणि सत्कर्माच्या नियमावर आधारित आहे. इथे साधनही तेवढेच महत्त्वपूर्ण आहे, जेवढे ध्येय. उद्दिष्टांनाही तीच महत्ता प्राप्त आहे, जी साधनांना प्राप्त आहे. हे एक अविभक्त/संघटनात्मक ऐक्य आहे. जीवनविकासाचे रहस्य या दोघांचा मेळ असण्यावरच अवलंबून आहे. जर हे एकमेकांपासून विभक्त झाले तर ते दुर्बल व नष्ट होतील. इस्लाम धर्मात श्रध्दा आणि कर्म यांना विभक्त केले जाऊ शकत नाही. सत्यज्ञानावर सत्कर्माचा साज चढविला पाहिजे, जेणेकरून चांगले फळ प्राप्त होईल. ''जे लोक श्रद्धा बाळगतात आणि सत्कर्म करतात, केवळ तेच स्वर्गात जाऊ शकतील,'' हे कुरआनने वारंवार सांगितले आहे. याची पन्नासपेक्षा जास्त वेळा पुनरावृत्ती झालेली आहे. विचारचिंतन व मनन यावर उद्युक्त जरूर केले गेले आहे. परंतु विचारचिंतन व मनन हेच केवळ ध्येय नव्हे. जे लोक केवळ श्रद्धा बाळगतील, पण त्यानुसार आचरण करीत नसतील तर त्यांचे इस्लाम धर्मात काहीच स्थान नाही. जे श्रद्धा तर बाळगतात, पण त्याचबरोबर दुराचारही करतात तर त्यांचे श्रद्धा ईशनियम मात्र विचारप्रणाली नव्हे, किंबहुना तो एक कर्म आणि प्रयत्नांचा नियम आहे. हा धर्म लोकांना ज्ञान, कर्मशील व कर्मज्ञानवान बनवून निरंतर व शाश्वत उन्नतीचा मार्ग दाखवितो.

परंतु ती खरी श्रद्धा कोणती ज्याद्वारे सत्कर्म जाहीर होते, ज्याच्या परिणामस्वरूप पूर्ण समाधान प्राप्त होते? इस्लामचा मूलभूत सिद्धान्त एकेश्वरत्व आहे. ''अल्लाह केवळ एकच आहे. त्याखेरीज कोणीही उपास्य नाही.'' हा इस्लामचा मूलमंत्र आहे. इस्लामच्या समस्त शिकवणी व कर्म याच्याशीच निगडीत आहेत. तो केवळ आपल्या दिव्य आणि अलौकिक गुण व क्षमतेच्या दृष्टीनेही निरुपमेय व एकमेव आहे.

जेथपावेतो अल्लाहच्या गुणविशेषांचा संबंध आहे, अन्य गोष्टीप्रमाणेच इथे इस्लामचे सिद्धान्त अतिशय मौल्यवान आहेत. ही आस्था एकीकडे ईश्वर निर्गुण असण्याच्या कल्पनेस अमान्य करते. दुसरीकडे इस्लाम त्या गोष्टींना चुकीच्या ठरवितो, ज्याद्वारे अल्लाहच्या त्या गुणांचा आभास होतो, जे सर्वथा भौतिक गुण आहेत. एकीकडे

कुरआन असे म्हणतो की, त्यासारखा आणखी कोणी नाही तर दुसरीकडे तो या गोष्टीचेही समर्थन करतो की तो पाहतो, ऐकतो व जाणतो. तो असा सर्वसत्ताधिकारी आहे की ज्याच्या हातून तिळमात्र चूक भूल होऊ शकत नाही. त्याच्या सामर्थ्यांचे प्रभावशाली जहाज, न्याय आणि समानतेच्या सागरावर तरंगते. तो अतिशय कृपावंत व दयावंत आहे. तो सर्वांचा रक्षक आहे. इस्लाम या होकारात्मक स्वरूपास प्रस्तुत करून थांबत नाही, तर तो समस्येच्या नकारात्मक पैलूसही दृगोच्चर करतो. हे त्याचे अतिमहत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. त्याखेरीज अन्य कोणीही नाही, जो सर्वांचा रक्षणकर्ता आहे. तो प्रत्येक दुभंगलेल्यास जोडणारा आहे. त्याच्याखेरीज अन्य कोणी नाही, जो दुभंगलेल्यास जोडू शकेल. तोच प्रत्येक प्रकारच्या आशा आकांक्षेपासून दूर आहे. त्यानेच शरीररचना केली, तोच आत्म्यांचा निर्माणकर्ता आहे. तोच न्यायाच्या दिवसाचा स्वामी आहे. सारांश हा की, कुरआनानुसार सारे श्रेष्ठ व महान गुण त्याच्यात आढळून येतात.

विश्वासंदर्भात सृष्टीच्या तुलनेत माणसाची जी योग्यता आहे त्याबाबत कुरआन म्हणतो, या पृथ्वीवर आणि आकाशामध्ये जे काही आहे, त्या सर्वांना अल्लाहने तुमच्या कामी लावलेले आहे. तुम्हाला सृष्टीवर शासन करण्यासाठी नियुक्त केले गेले. परंतु अल्लाह संदर्भात कुरआन म्हणतो, ''लोकहो, अल्लाहने तुम्हाला उत्कृष्ट योग्यता प्रदान केली आहे. त्याने जीवन बनवले, मृत्यूही बनविला, जेणेकरून तुमची कसोटी घेतली जावी की कोण सत्कर्म करतो व कोण सन्मार्गापासून विचलित होतो.''

मनुष्य एका मर्यादेपर्यंत आपल्या इच्छेनुसार कर्म करण्यास स्वतंत्र आहे. असे असतानाही तो विशिष्ट वातावरण, परिस्थिती आणि क्षमतेच्या भोवऱ्यात अडकला आहे. मनुष्य आपले जीवन त्या निर्धारित सीमारेषेच्या आत व्यतीत करण्यास विवश आहे, ज्यावर त्याचा स्वत:चा काही अधिकार नाही. यासंदर्भात इस्लामच्या अनुसार अल्लाह म्हणतो, मी आपल्या इच्छेनुसार माणसाला त्या परिस्थितीमध्ये निर्माण करतो, ज्यांना मी उचित समजतो. अमर्याद सृष्टी योजनांना नाशिवंत मानव पूर्णपणे समजत नाही. परंतु मी निश्चितच सुख-दु:खात, आरोग्य आणि आजारपणात, उन्नती व अवनतीत तुमची कसोटी घेईन. माझ्या कसोटींची पद्धती प्रत्येक मनुष्य, काळ व युगाकरिता वेगळी असू शकते. यासाठी संकटात निराश होऊ नका आणि संपन्नावस्थेत अल्लाहला विसरू नका. ईशदेणग्या तर तुम्हाला केवळ अनामतीच्या स्वरूपात लाभल्या आहेत. तुम्ही प्रत्येक वेळी, प्रत्येक क्षणी कसोटीत असता. जीवनाच्या या चक्र व प्रणाली संदर्भात तुम्ही द्विधावस्थेत पडण्याची गरज नाही. किंबहुना आमरण कर्म करीत राहाणे हेच तुमचे कर्तव्य होय. जर तुम्हाला जीवन लाभले आहे, तर अल्लाहच्या इच्छेनुसार जगा आणि मरण पावत

असाल तर तुमचा मृत्यू ईश्वराच्या मार्गात व्हावा. तुम्ही याला दैव म्हणू शकता. परंतु या प्रकारचे दैव तर अशा सामर्थ्य आणि जीवनवर्धक प्रयत्नांचे नाव आहे जे तुम्हाला सदैव सचेत राखतात. या जगी लाभलेल्या अस्थायी व तात्पुरत्या जीवनाला मानव अस्तित्वाचा अंत समजू नका. मृत्यूनंतर आणखी एक जीवन आहे. या जीवनानंतर येणारे जीवन ते द्वार आहे, जे उघडल्यावर जीवनाची अज्ञात तथ्ये प्रकट होतील. या जीवनाचे प्रत्येक कार्य, मग ते कितीही सामान्य स्वरूपाचे का असेना, त्याचा प्रभाव सदैव टिकून राहाणारा असतो. तो यथायोग्यरीत्या अंकित केला जातो. अल्लाहच्या काही कार्यपद्धतीचे तुम्हाला आकलन तर होते, परंतु कित्येक गोष्टी तुमच्या आकलनाबाहेरच्या व दृष्टीला न दिसणाऱ्या आहेत. स्वतः तुमच्यात ज्या गोष्टी लपलेल्या आहेत आणि जगातील ज्या गोष्टी तुम्हाला ज्ञात नाहीत, त्या सर्व दुसऱ्या जगतात अर्थात मरणोत्तर जीवनात तुमच्यासमोर उघड केल्या जातील. सदाचारी व नेक लोकांना अल्लाहचे ते वरदान लाभेल ज्याला ना डोळ्यांनी पाहिले, ना कानांनी ऐकले आणि न मनाने त्याची कधी कल्पना केली असेल. त्याची कृपा व इनाम क्रमशः वाढतच जातील आणि त्याला अधिकाधिक उन्नती लाभेल. परंतु ज्यांनी या जीवनात लाभलेली संधी वाया घालवली तर ते त्या अनिवार्य कायद्याच्या तावडीत सापडतील ज्यायोगे माणसाला आपल्या दुष्कर्माची गोडी चाखावी लागेल. स्वतःला ज्या आत्मिक व्याधी त्यांनी जडवून घेतल्या होत्या, त्या व्याधींपायी त्यांना उपचाराच्या एका अवस्थेतून पार पाडावे लागेल. सावध व्हा, मोठी कठोर आणि भयंकर शिक्षा आहे. शारीरिक यातना तुम्ही कशी तरी झेलू शकता, परंतु आत्मिक पीडा तर नरकाग्नी आहे, जी तुम्हाकरिता अगदी असह्य आहे. यास्तव या जीवनातच आपल्या मनोविकारांशी सामना करा, जे अपराधांकडे प्रवृत्त करतात आणि दुराचारास प्रेरणा देतात. तुम्ही ती अवस्था प्राप्त करा, जेव्हा अंतरात्मा जागृत होईल आणि महान नैतिक गुण प्राप्त करण्याकरिता तो व्याकुळ होईल आणि अल्लाहची अवज्ञा करण्याविरुध्द बंड करील. हे तुम्हाला मानसिक शांतीच्या अंतिम टप्प्या प्रत पोहचवील. म्हणजेच अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्याच्या स्थानाप्रत आणि केवळ अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्याच्या स्थानापर्यंत. केवळ अल्लाहच्या प्रसन्नतेत आत्म्याचा आपला आनंद सामावलेला आहे. अशा स्थितीत आत्मा विचलित होण्याची शक्यता राहाणार नाही. संघर्षावस्था पार पडलेली असेल. शेवटी सत्याचाच विजय होतो आणि असत्याला शस्त्र खाली ठेवावे लागते. त्या वेळी सर्व मानसिक विमनस्कता दूर होईल. तुमचे मन द्विधावस्थेत राहाणार नाही. तुमचे व्यक्तिमत्त्व अल्लाह आणि त्याच्या अभिलाषेकरिता पूर्ण भावनेने संगठीत व एकत्रित होईल. आत्म्यास पूर्ण शांती प्राप्त होईल, तेव्हा अल्लाह तुम्हाला म्हणेल, ''हे संतुष्ट आत्मा, तू आपल्या पालनकर्त्याशी पूर्णतः राजी झाला, तू आता आपल्या पालनकर्त्याकडे परत ये. तू

त्याच्याशी प्रसन्न आहे आणि तो तुझ्यावर प्रसन्न आहे.'' याच्या परिणामस्वरूप त्याला लाभेल सुख व पूर्ण सुख, समाधान व पूर्ण समाधान, शांती व पूर्ण शांती! या अवस्थेत ईश्वराचे प्रेम त्याचा आहार बनते आणि तो जीवन सागरातून यथेच्छ पिऊन आपली तहान भागवितो. नंतर मात्र न दुःख निराशा त्याला पराभूत व वशीभूत करू शकते आणि न समृध्दीत तो गर्वोन्मत्त होऊन आत्मनियंत्रण हरवून बसतो.

थॉमस कार्लायल या जीवनदर्शनाने प्रभावित होऊन लिहितो, ''आणि मग इस्लामचीदेखील हीच मागणी आहे, आम्ही स्वतःला अल्लाहकरिता समर्पित केले पाहिजे. तो आमच्याशी जे काही करतो, आम्हाला जे काही पाठवितो, मग तो मृत्यु का असेना किंवा त्याहून वाईट एखादी गोष्ट, ती वास्तविक आमच्या भलाईची आणि आमच्याकरिता उत्तमच असेल. अशाप्रकारे आम्ही स्वतःला अल्लाहच्या प्रसन्नतेकरिता समर्पित करतो.'' लेखक पुढे गोयटेच्या एका प्रश्नाचा उल्लेख करतो. गोयटे विचारतो, ''जर हा इस्लाम आहे तर आम्ही सर्व इस्लामी जीवन जगत नाही काय?'' त्याच्या उत्तरादाखल कार्लायल लिहितो, ''होय, आमच्यापैकी ते सर्व, जे नैतिक व सदाचारी जीवन जगतात, ते सर्वच इस्लामांतर्गत जीवन व्यतीत करीत आहेत. शेवटी हे तर ते सर्वोच्च ज्ञान आणि प्रज्ञा आहे, जी आकाशाहून या भूतलावर अवतरित केली गेली आहे.''

– समाप्त –